
# ४. वादन










## वादन परिचय

गीता एक गोड गुणी मुलगी, नेहमी शांत असे. कुणाबरोबर जास्त बोलायची नाही. खेळायची नाही. सतत काही तरी विचार करायची. तिला पानांची सळसळ ऐकायला आवडायची पाण्याच्या थेंबाची टिपटिप असो किंवा सुतार पक्ष्याची झाडाच्या खोडावरील टकटक असो. हा आवाज ती मन लावून ऐकायची. देवघरातील छोट्या घंटीची किणकिण आणि शाळेतील तसेच मंदिरातील घंटेचा मोठा नाद कसा निर्माण होतो याचा ती विचार करायची. वेगवेगळ्या वस्तूंचा एकमेकांवर आघात झाला किंवा दोन वस्तू एकमेकांवर आदळल्या की त्यातून एका विशिष्ट प्रकारच्या आवाजाची निर्मिती कशी होते हे तिला समजेना.


हीच शंका घेऊन ती शाळेत संगीत शिकवणाऱ्या बाईंकडे गेली. बाईंनी तिला खूप छान समजावून सांगितले. हे बघ गीता,

- हवेच्या सहाय्याने वाजवली जाणारी वाद्ये म्हणजे सुषिर वाद्ये.
- चमड्याने मढवलेली वाद्ये म्हणजे अवनद्ध वाद्ये.
- तारा असणारी वाद्ये म्हणजे तंतूवाद्ये.
- घन वस्तूंचा एकमेकांवर आघात करून वाजवल्या जाणाऱ्या वाद्यांना घन वाद्ये असे म्हणतात.









यामध्ये टाळ, झांज, चिपळ्या, लेझीम, टिपऱ्या, घंटा, ट्रँगल, खंजिरी इत्यादी वाद्यांचा समावेश होतो.

शांत पाण्यात खडा टाकल्यावर जसे तरंग निर्माण होतात. अगदी तसेच ध्वनितरंग या वाद्यांमधून निर्माण होतात. त्यामुळे त्या वाद्यांचा आवाज आपणास येतो. या वाद्यांचे वैशिष्ट्य म्हणजे आघातातून आवाजाची निर्मिती होते. ही वाद्ये साथसंगत करण्यासाठी वापरतात.

माहिती सांगत सांगत बाईंनी संगीत वर्गात नेले. सगळी खोली वाद्यांनी भरलेली तिथे अनेक प्रकारची वाद्ये तिला पहायला मिळाली. तबला, पेटी (हार्मोनियम), ढोलकी, सतार, बासरी, टाळ, झांज, टिपऱ्या, खंजिरी, लेझिम, व्हायोलिन, तुतारी, शंख, सनई, सारंगी.... बापरे! या सगळ्या वाद्यांची नावे लक्षात राहतील का? मित्रांनो, चित्रातील वाद्यांची नावे ओळखा पाहू.



- चित्रातील वाद्यांचे निरीक्षण करून नावे सांगावीत. शक्य असल्यास वाद्ये हाताळण्यास द्यावी. उपलब्ध वाद्यांचा परिचय करून द्यावा.